पश्चिम महाराष्ट्रातील सर्वाधिक जिल्ह्यातून वितरीत होणारे

दैनिक राष्ट्रतेज

PCW/012/2012-14

• पुणे, सोमवार, दि. २२ डिसेंबर २०१४



# डेल्ला ॲडव्हेंचर आणि डेल्ला रेसॉर्ट: थरारक वीकेण्डकरिता सुयोग्य स्थळ

पुणे : तुम्हाला तुमचा वीकेण्ड मजेत व्यतीत करायचा असेल तर व्यवसाय जगतातील प्रख्यात आणि लोकप्रिय व्यक्तिमत्त्व श्री. जिम्मी मिस्त्री (मुख्य डिझायनर आणि व्यवस्थापकीय संचालक) यांच्या संकल्पनेतून प्रत्यक्षात आलेले डेल्ला ॲडव्हेंचर आणि डेल्ला रेसॉर्ट अतिशय योग्य जागा आहे. डेल्ला ॲडव्हेंचर आणि डेल्ला रेसॉर्टमधील सोयीसुविधा आणि त्याची रचना इतकी उत्कृष्ट आहे की देशातील सर्वोत्कृष्ट रेसॉर्ट्समध्ये याची सहज गणना होऊ शकेल. या रेसॉर्टमधील, विशेषतः लक्झरी रूम्समधील आरामदायीपणा असो वा सोयीसुविधा असोत, कशातही कोणत्याही पद्धतीची तडजोड केली गेलेली नाही. येथील खाद्यानुभव आणि सेवा हा एक अविस्मरणीय अनुभव असतो. येथील जेवण अतिशय उत्कृष्ट आणि स्वादिष्ट असून येथील कर्मचारी वर्ग सतत तुमच्या दिमतीस हजर असतो. वीकेण्ड व्यतीत करण्याचे स्थळ असलेल्या डेल्ला ॲडव्हेंचर आणि डेल्ला रेसॉर्टमध्ये भारतात याआधी कधीही न पाहिल्या गेलेल्या अनेक ॲडव्हेन्चर उपक्रमांची रेलचेल आहे. श्री. मिस्त्री अभिमानाने म्हणाले, हे जागतिक दर्जाचे एक्स्ट्रीम ॲडव्हेन्चर पार्क असल्याने भारताला आपसूकच आंतरराष्ट्रीय ॲडव्हेन्चर जगतात ओळख प्राप्त होते. ४३ एकर्सवर पसरलेल्या या रेसॉर्टमध्ये १०० निरनिराळे ॲडव्हेन्चर उपक्रम असून येथील पंचतारांकित रेसॉर्ट्स, आलिशान व्हिला आणि बँक्वेटींगचे अनेक पर्याय पाहता यांसारखे दुसरे पार्क नाही असे म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही. तुम्हाला हे रेसॉर्ट पूर्णपणे अनुभवून पाहायचे असेल तर तुम्हाला किमान दोन दिवस काढून यावे लागेल. उत्तम, उमदे मनोरंजन काय असते याचा प्रत्यय इथे येतो. एखाद्या संस्थेला किंवा कुटुंबाला मनोरंजनाकरिता काय हवे असते ते सर्व काही इथे उपलब्ध आहे. आकार, खेळ, वैविध्य, सोयीसुविधा आणि आलिशानपणा यांच्या संदर्भात पाहता हे भारतातील पहिलेवाहिले रेसॉर्ट ठरेल. आम्ही तुमच्याकरिता खरोखरीचे जागतिक दर्जाचे ॲडव्हेन्चर रेसॉर्ट देऊ केले आहे. डेल्ला ॲडव्हेंचर आणि डेल्ला रेसॉर्टमध्ये असलेल्या १००हून अधिक ॲडव्हेन्चर उपक्रमांमध्ये एटीव्ही, फ्लाईंग फॉक्स, डर्ट बाईक्स, स्कूप, ॲक्वा झोर्बिंग, लँड झोर्बिंग, रोलर झोर्ब, जंगल कॅम, रॉकेट इजेक्टर, पेण्टबॉल, रेडीयो कंट्रोल्ड कार्स, रेडीयो कंट्रोल्ड प्लेन्स आणि रेडीयो कंट्रोल्ड हेलिकॉप्टर्स तसेच हार्ड बॉल क्रिकेटचा समावेश आहे.

